# पावसाची दडी, शेतकरी हतबल, व्यापारी चिंतेत




सिरसाळा/अतुल बडे

परळी तालुक्यासह सिरसाळा परिसरात गेल्या तीन आठवड्यांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामावर संकटाचे ढग दाटले आहेत. शेतात डोलणारी कापूस, सोयाबीन," मूग आणि बाजरीची पिके आता पाण्याअभावी माना टाकू लागली आहेत. पिके डोळ्यादेखत सुकू लागल्याने बळीराजा पूर्णपणे हतबल झाला असून आभाळाकडे डोळे लावून पावसाची प्रतीक्षा करत आहे. या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांसोबतच व्यापारी वर्गातही चिंतेचे वातावरण पसरले आहे.

यंदाच्या हंगामाची सुरुवात चांगली झाली होती. जून महिन्यात वेळेवर झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी

मोठया उत्साहात पेरण्या उरकल्या होत्या. पिकांनीही चांगला जम धरला होता. सोयाबीन, कापूस, मूग, बाजरी ही पिके जोमात वाढत होती. मात्र श्रावण महिन्यात पावसानेच फिरवल्याने पाठ चित्र पालटले आहे. सध्या जमिनीतील ओलावा पूर्णपणे संपला आहे. विहिरी, तलावांच्या पाणी पातळीतही मोठी घट झाली आहे. कडक ऊन आणि ढगाळ वातावरणामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. एका एकरासाठी १५ ते २० हजार रुपयांपर्यंत खर्च करूनही हातात काहीच लागणार नाही या भीतीने शेतकरी चिंताग्रस्त आहे. अनेक

**व्यापारी वर्गातही अस्वस्थता**

शेतीवरच येथील बाजारपेठ अवलंबून आहे. खरीप हातचे गेल्यास शेतकऱ्यांकडे पैसा येणार नाही आणि त्याचा थेट फटका बाजारपेठेला बसेल. त्यामुळे खत, बियाणे, किराणा आणि कापड व्यापाऱ्यांमध्येही मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांनी सावकाराकडून, बँकेकडून कर्ज काढून पेरणी केली आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवसांत पावसाची शक्यता वर्तवली असली तरी तोपर्यंत पिके तग धरतील का, हा मोठा प्रश्न आहे. वेळेवर पाऊस न झाल्यास मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागेल.

# मुंबईने कामगारांची पोटं भरली; भांडवलदारांचे कधी भरणार?

मुंबईचा इतिहास पाहताना एक प्रश्न वारंवार मनात येतो—या शहराने नेमके कोणाचे पोट भरले आणि कोणाची भूक वाढवत ठेवली?

एक काळ असा होता की ग्रामीण महाराष्ट्रात रोजगाराच्या संधी मर्यादित होत्या. शेतीवर संसार अवलंबून होता; मात्र वर्षभर पुरेल असे उत्पन्न अनेक कुटुंबांना मिळत नसे. अशा परिस्थितीत घरातील एखादा तरुण रोजगाराच्या शोधात मुंबईकडे येत असे. मुंबईत मिळणाऱ्या कमाईवर त्याचे स्वतःचेच नव्हे, तर गावाकडील कुटुंबाचेही जगणे अवलंबून असे. मुंबईतील कापड गिरण्यांमध्ये ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर कामगार आले होते आणि त्यांच्या कमाईचा संबंध त्यांच्या गावांशी कायम राहिला.

मुंबईने या कामगारांना रोजगार दिला. त्यांनी मुंबईला आपला घाम दिला. गिरण्या, कारखाने, बांधकाम, वाहतूक, बाजारपेठा आणि शहरातील असंख्य कामे त्यांच्या श्रमावर उभी राहिली. मुंबईची औद्योगिक ओळख निर्माण होत असताना कामगारांचीही स्वतंत्र सामाजिक आणि सांस्कृतिक ओळख निर्माण झाली.

पण कामगाराचा प्रश्न केवळ रोजगार मिळण्यापुरता नव्हता. त्याला वेतन किती मिळते, कामाच्या अटी कशा आहेत आणि त्याच्या श्रमातून निर्माण होणाऱ्या संपत्तीत त्याचा वाटा किती आहे, हे प्रश्नही त्याच्याबरोबर चालत राहिले. मुंबईच्या कामगार इतिहासात वेतन आणि कामाच्या परिस्थितीसाठी अनेक संघर्ष झाले.

याच कामगार वर्गाने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. मुंबई महाराष्ट्रात असावी, मराठी भाषिक महाराष्ट्राची निर्मिती व्हावी, या मागणीसाठी कामगारांसह विविध सामाजिक घटक रस्त्यावर उतरले. आंदोलनात अनेकांनी प्राण गमावले. उपलब्ध ऐतिहासिक नोंदींनुसार हुतात्म्यांमध्ये गिरणी कामगारांचाही मोठा सहभाग होता.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि मुंबई त्याची राजधानी झाली. हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरला. संयुक्त महाराष्ट्रासाठी ज्यांनी रक्त दिले, त्यात कामगारांचे योगदान विसरता येणार नाही.

पण काळ बदलला.

मुंबईच्या गिरण्या कमी झाल्या. १९८२ च्या मोठ्या गिरणी संपानंतर वस्त्रोद्योगातील रोजगाराची रचना मोठ्या प्रमाणावर बदलली. अनेक कामगार बेरोजगार झाले आणि काहींना पुन्हा गावाकडे जावे लागले. मुंबईतील माजी गिरणी कामगारांच्या पुढील जीवनावरही या बदलाचा मोठा परिणाम झाला.

आजची मुंबई वित्त, व्यापार, बांधकाम, सेवा, वाहतूक, मनोरंजन आणि विविध आधुनिक उद्योगांचे केंद्र आहे. कामाचे स्वरूप बदलले असले तरी कामगाराची गरज संपलेली नाही.




शहराच्या रोजच्या जीवनामागे आजही असंख्य हात काम करतात. इथेच माझ्या मनात एक साधा प्रश्न निर्माण होतो—

मुंबईने कामगारांची पोटं भरली; भांडवलदारांचे कधी भरणार? हा प्रश्न कुणा एका भांडवलदाराविषयी नाही. हा श्रम आणि भांडवल यांच्या नात्याविषयी आहे. कामगाराला पगार मिळतो. तो घर चालवतो, मुलांना शिकवतो, भाडे भरतो, प्रवास करतो आणि महागाईशी सामना करतो. त्याच्या श्रमातून उत्पादन निर्माण होते, सेवा निर्माण होतात आणि व्यवसाय चालतात. पण त्याच वेळी संपत्तीची मालकी ज्यांच्याकडे आहे त्यांची संपत्ती वाढत जाते. म्हणून प्रश्न असा आहे—कामगार जे निर्माण करतो, त्याच्या तुलनेत त्याला मिळणारा हिस्सा किती आहे? मुंबईत उंच इमारती उभ्या राहतात. त्या उभ्या करणाऱ्या कामगाराचे हात मात्र अनेकदा त्याच इमारतीत राहू शकत नाहीत. शहरात मोठे व्यवसाय वाढतात; पण त्या व्यवसायांना चालना देणाऱ्या अनेक कामगारांचे स्वतःचे भविष्य मात्र अनिश्चित राहते. ही विसंगती आपल्याला विचार करायला लावते. शहराची श्रीमंती वाढणे चांगलेच आहे. उद्योग वाढले पाहिजेत. भांडवल आले पाहिजे. नवीन रोजगार निर्माण झाले पाहिजेत. पण विकासाचा अर्थ केवळ भांडवल वाढणे असा असू शकत नाही. श्रम करणाऱ्या माणसाच्या जीवनातही त्या विकासाचा परिणाम दिसला पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील कामगारांचा इतिहास येथे पुन्हा आठवतो. ज्यांनी महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी संघर्ष केला, त्यांच्यासाठी महाराष्ट्र हा केवळ नकाशावरील प्रदेश नव्हता. तो आपल्या श्रमाचा, सन्मानाचा आणि भविष्याचा प्रदेश होता. आज महाराष्ट्राचा विचार करताना रोजगाराचा प्रश्न त्यामुळे अधिक व्यापकपणे पाहावा लागतो. गावात रोजगार असेल तर तरुणाला रोजगारासाठी मुंबईकडे येण्याची सक्ती कमी होईल. महाराष्ट्रातील विविध भागांत उद्योग, सेवा, पर्यटन, कृषीप्रक्रिया आणि आधुनिक व्यवसाय वाढले तर विकास अधिक संतुलित होईल. पण मुंबईचे महत्त्व कमी करून हा प्रश्न सुटणार नाही. मुंबई महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे अत्यंत महत्त्वाचे केंद्र आहे. प्रश्न असा आहे की मुंबईच्या आर्थिक सामर्थ्याचा लाभ तिच्या श्रमशक्तीला आणि महाराष्ट्रातील सामान्य माणसाला किती मिळतो? मुंबईने एका काळी बेरोजगारी आणि अपुऱ्या उत्पन्नाचा सामना करणाऱ्या ग्रामीण कुटुंबांना आधार दिला. कामगार मुंबईत आला, काम केले आणि आपल्या कुटुंबाला उभे केले. त्याच कामगाराने मुंबई घडवली आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही योगदान दिले. म्हणून आज मुंबईच्या संपत्तीकडे पाहताना त्या संपत्तीमागचा घाम विसरता येणार नाही. मुंबई कामगारांच्या श्रमाने मोठी झाली. आता प्रश्न एवढाच आहे—त्या मोठेपणात कामगाराचा वाटा किती मोठा झाला? भांडवलदारांनी संपत्ती निर्माण करावी, उद्योग वाढवावेत, नफा कमवावा—हे अर्थव्यवस्थेचा भाग आहे. पण कामगाराच्या श्रमाला योग्य मूल्य मिळणेही तितकेच आवश्यक आहे. कारण उद्योगाला भांडवल लागते, पण भांडवलाला उत्पादनात रूपांतरित करणारा श्रमही लागतो.

म्हणूनच हा प्रश्न पुन्हा विचारावासा वाटतो—

मुंबईने कामगारांची पोटं भरली; भांडवलदारांचे कधी भरणार?

कदाचित या प्रश्नाचे उत्तर मुंबईकडे नाही; ते आपल्या आर्थिक व्यवस्थेच्या विचारात आहे. विकास किती झाला, यापेक्षा त्या विकासाचा लाभ कोणाला किती मिळाला, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

मुंबईची उंची तिच्या इमारतींनी वाढत राहो. तिची संपत्ती वाढत राहो. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मजबूत होत राहो. पण त्या प्रत्येक वाढीमध्ये कामगाराच्या ताटातही थोडे अधिक यायला हवे.

कारण मुंबई घडवणाऱ्या हातांचे पोट भरले, तरच मुंबईच्या समृद्धीला खरा अर्थ प्राप्त होईल.

– **डॉ. सुवर्णा कराड**, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.

# सुनीता नागरगोजे व ज्ञानेश्वर नागरगोजे यांचा भव्य सत्कार



बीड | प्रतिनिधी

बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच, महाराष्ट्र राज्य च्या बीड जिल्हा महिला अध्यक्षपदी सुनीता नागरगोजे यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे तसेच ज्ञानेश्वर नागरगोजे गायक यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली त्याबद्दल दोघांचाही शासकीय विश्रामगृह केज या ठिकाणी कला विश्व् समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच सांस्कृतिक क्षेत्रात बहुजन समाजाचे विचार तळागाळात पोहोचवण्यासाठी आणि महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ही निवड करण्यात आल्याचे संघटनेतर्फे सांगण्यात आले.

या निवडीबद्दल सुनीता नागरगोजे यांनी बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार सन्माननीय दत्ता शिंदे, उपाध्यक्ष तात्याराव झेंडे आणि कार्याध्यक्ष बाबासाहेब केदार सर यांचे विशेष आभार मानले आहेत.

आपल्या निवडीवर बोलताना सुनीता नागरगोजे म्हणाल्या, "वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरवेन. बीड जिल्ह्यातील महिला कलावंतांना एकत्र करून त्यांच्या हक्क व व्यासपीठ मिळवून देणे आणि लोककलेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करणे हे माझे मुख्य उद्दिष्ट असेल."

या निवडीबद्दल बीड जिल्ह्यातील विविध सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांतील विजय मस्के राज्य उपाध्यक्ष, बाबासाहेब साहेबराव गायकवाड जिल्हा सरचिटणीस , विठ्ठल अनेराव जिल्हाध्यक्ष , महादेव लिंबाजी ठोंबरे , अर्जुन किसन शिंदे जिल्हा संरक्षक प्रमुख, कला विश्व समितीचे सर्व सोबत सदस्य यांच्यासह बापू वैरागे यांनी या सत्काराचे आयोजन केले होते व इत्तर मान्यवरांकडून सुनीता नागरगोजे व गायक ज्ञानेश्वर नागरगोजे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## लेखन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित

# 'प्रज्ञावंत साहित्यिक अण्णा भाऊ साठे' परिसंवाद ज्ञानसत्र संपन्न

नाशिक | प्रतिनिधी

दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी, साजऱ्या होत असलेल्या 'लेखन प्रेरणा' दिनानिमित्त 'प्रज्ञावंत साहित्यिक अण्णा भाऊ साठे' या विषयावर परिसंवाद ज्ञानसत्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडीओवर विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांची संकल्पना व प्र- कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शक सूचनेनुसार दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी हे ज्ञानसत्र संपन्न झाले. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी या ज्ञानसत्राचे समन्वयन व सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन केले.







समग्र परिवर्तनाची आस, कामगार चळवळ, दलित चळवळ, मार्क्सवादी व आंबडेकरवादी धगधगते भारतीय समाज वास्तव जातीअंत व वर्गअंत यावर आधरित जानिवा पूर्ण करणारे लेखनही प्रज्ञावंत साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांच्या नव्या युगाची हाक होती असे विवेचन डॉ. राजेंद्र बगाटे, डॉ . सचिन पोरे, डॉ. वासुदेव राऊत, प्रा. विजयकुमार पाईकराव या सर्वच परीसंवादकांनी केले.

हा कार्यक्रम अध्ययनार्थी व श्रोत्यांसाठी https://avc.ycmou.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर कायमस्वरूपी श्रवणासाठी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ दृक्श्राव्य केंद्राचे प्रमुख प्रा. जयदीप निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रसहाय्यक श्री. प्रकाश सापनर, श्री. गिरीश गवळी यांनी तांत्रिक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचा अध्ययनार्थी, शिक्षक, संशोधक तसेच सर्व नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनप्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. दिपक राजगिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड, मंगळवार, 25 ऑगस्ट 2026

# ग्रामीण मतदार संघातील ३९ हजार लाभार्थ्यांना मिळणार हक्काचे घर - आ. रमेशआप्पा कराड



**लातूर | प्रतिनिधी**

स्वतःच्या हक्काचे घर असावे या अपेक्षेने अनेक वर्षापासून प्रतीक्षेत असलेल्या लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील ३९ हजार पात्र लाभार्थ्यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून लवकरच टप्प्या टप्प्याने हक्काचे घर मिळणार असल्याची माहिती भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित आणि सन्मानाने जगण्यासाठी स्वतःचे घर असणे आवश्यक आहे. गरीब गरजू, आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि बेघर कुटुंबांना स्वतःच्या हक्काचे पक्के घर उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून पंतप्रधान आवास योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील गावागावातील आणि वाडी वस्तीतील पात्र लाभार्थ्यांची संख्या मोठी असून घराच्या प्रतिक्षेत असलेल्या कुटुंबांना लवकरच हक्काचे घर मिळणार आहे.

गेल्या मार्च २०२५ पूर्वी त्या त्या गावातील गरीब गरजू आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि बेघर कुटुंबाचा ग्रामसेवकांनी सर्व्हे करून शासनाच्या निकषानुसार याद्या तयार करण्यात आल्या. १५ ऑगस्टच्या निमित्ताने आयोजित त्या त्या गावातील ग्रामसभेत सदरील लाभार्थ्यांच्या यादीचे वाचन करून मान्यता देण्यात येत आहे असं सांगून भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लातूर तालुक्यात २२ हजार ३००, रेणापूर तालुक्यात ११ हजार ५६० आणि भादा सर्कल मध्ये ५ हजार २६ तर रेणापूर शहरातील ४५० याप्रमाणे लातूर ग्रामीण मतदार संघात एकूण ३९ हजार ३३६ लाभार्थ्यांच्या प्रस्तावांना ग्रामसभेत मंजुरी देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ग्रामसभेची मान्यता मिळाल्यानंतर शासनाने ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार यादीतील लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात येईल शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार पात्र लाभार्थ्यांना घरकुलासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे सांगून भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्या वर्षी लातूर तालुक्यात ८ हजार ५८१, रेणापूर तालुक्यात ४ हजार ६३३, रेणापूर शहरातील १ हजार १०२ आणि भादा सर्कल मधील ३ हजार ३५२ असे एकूण १७ हजार ६६८ लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेतून घरकुल मंजूर झाले त्यातील अनेकांनी घराचे बांधकाम केले काही जणांची प्रगतीपथावर आहे.

घरकुल पासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या होत्या. आ. कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण मतदार संघात तब्बल ३९ हजार ३३६ कुटुंबाच्या घराचे स्वप्न साकार होत असून घरकुल मंजूर झाल्यावर निश्चितपणे या पात्र लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य पाहावयास मिळेल.

# ह.भ.प. सुनील महाराज पवार, संगमनेरकर यांच्या सुश्राव्य कीर्तनाने वाहिरा नगरी दुमदुमली;

## नामयज्ञाचा चौथा दिवस भक्तिरसात रंगला



प्रतिनिधी - सोपान पगारे

आष्टी तालुक्यातील वाहिरा येथे संत शिरोमणी शेख महंमद महाराज यांच्या पावनभूमीत, ब्रह्मलीन प.पू. माणिकगिरीजी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने आणि ह.भ.प. महंत मठाधिपती दत्तगिरीजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली मौजे वाहिरा, माणिक गड ट्रस्ट येथे सुरू असलेल्या ४६ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचा चौथा दिवस अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

चौथ्या दिवसाच्या कीर्तन सेवेसाठी संगमनेरचे प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. सुनील महाराज पवार, संगमनेरकर यांचे आगमन झाले होते. नाम हेचि तारक` या विषयावर त्यांनी केलेल्या अभंगाच्या निरूपणाने अवघी वाहिरा नगरी दुमदुमून गेली. त्यांच्या ओघवत्या वाणी, विनोद आणि परमार्थाच्या अचूक सांगड घालत केलेल्या कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध झाले. श्रोते टाळ-मृदुंगाच्या गजरात तल्लीन झाले होते.

तत्पूर्वी या दिवशीचे संतपूजन तरटी वस्ती ग्रामस्थांच्या वतीने मोठ्या भक्तिभावाने करण्यात आले. संतपूजनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

हा नामयज्ञ सोहळा २० ते २८ ऑगस्ट दरम्यान सुरू असून पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ज्ञान आणि नाम यज्ञाचा लाभ घ्यावा, असे आवाहन माणिक गड ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# दशनाम गोसावी समाजाचे राज्यस्तरीय महाअधिवेशन 26 ऑगस्टला बीडमध्ये

## जिल्हा युवा अध्यक्ष रवि बन यांचे समाज बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन

प्रतिनिधी - सोपान पगारे

दशनाम गोसावी समाज परिषद महाराष्ट्र राज्य आणि मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय महाअधिवेशन बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे दिनांक २६.०८.२०२६ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता संपन्न होणार आहे. या ऐतिहासिक अधिवेशनात गोसावी समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर सखोल चर्चा होणार असून, समाजातील विविध क्षेत्रांतील गुणवंत मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित केले जाणार आहे.या पार्श्वभूमीवर, दशनाम गोसावी समाज परिषदेचे जिल्हा युवा अध्यक्ष रवि बन यांनी जिल्ह्यातील समस्त गोसावी समाज बांधवांना या महाअधिवेशनासाठी मोठ्या संख्येने आणि वेळेवर उपस्थित राहण्याचे आग्रही आवाहन केले आहे. बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यस्तरीय महाअधिवेशन २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता सुरू होईल, इनाम जमीन हक्कावर लढा: मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषदेच्या माध्यमातून समाजाच्या जमिनीच्या हक्कांसंदर्भात महत्त्वपूर्ण रणनीती आखली जाईल.राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण: समाज प्रबोधन, शिक्षण, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव केला जाईल.सामाजिक ऐक्य व संघटन: राज्यातील संपूर्ण गोसावी समाजाला एकाच छताखाली आणून संघटन मजबूत करणे हा या मागचा मुख्य हेतू आहे.

"हे महाअधिवेशन गोसावी समाजाच्या हक्कांसाठी आणि अस्मितेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणाऱ्या या कार्यक्रमात समाजाच्या प्रगतीसाठी आणि भावी पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रत्येकाचे योगदान गरजेचे आहे. राज्यातील समाज बांधवाने



२६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहून हे अधिवेशन यशस्वी करावे," असे आवाहन रवि बन यांनी केले आहे. या अधिवेशनामुळे गोसावी समाजाच्या मागण्यांना नव्याने बळ मिळणार असून, प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे महाअधिवेशन मैलाचा दगड ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# सुकळी पुनर्वसनातील जुन्या घरांच्या मूल्यांकनानुसार २ कोटींचा ॲडव्हान्स मावेजा आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते वाटप

सिरसाळा | अतुल बडे

गुणवती बृहत् लघु पाटबंधारे प्रकल्पांतर्गत धारूर तालुक्यातील मौजे सुकळी गावाच्या पुनर्वसन प्रक्रियेला आता गती मिळाली आहे. सुकळी येथील गावठाणातील जुन्या घरांचे व खुल्या जागांचे शासनाच्या नियमानुसार मूल्यांकन करण्यात आल्यानंतर त्याआधारे ॲडव्हान्स मावेजा वाटपाचा कार्यक्रम आज, सोमवार दि. २४ ऑगस्ट रोजी माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात पार पडला.

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या हस्ते सुकळी येथील २०९ पात्र लाभार्थ्यांना सुमारे २ कोटी रुपयांचा ॲडव्हान्स मावेजा वितरित करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, लघु पाटबंधारे विभागाचे अधिकारी एन. एस. होसाळे, स.अ. श्रेणी-२, टी. ए. नागगोजे, कनिष्ठ अभियंता, व्ही. डी. गिरासे, स्था.अ.स., लघु पाटबंधारे उपविभाग, परळी वैजनाथ यांच्यासह संबंधित प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

सुकळी गावातील जुन्या घरांचे व जागांचे मूल्यांकन करून त्यानुसार मावेजा देण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने पुनर्वसन प्रक्रियेत असलेल्या ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. 20 वर्षापासून प्रलंबित असलेल्या पुनर्वसनातील मावेजाच्या प्रश्नाला आता मार्ग मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या कार्यक्रमास सुकळी गावचे सरपंच संतोष सौंदनकर, ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या समन्वयातून पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

दरम्यान, आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी सुकळी गावच्या पुनर्वसनातील उर्वरित प्रश्नही लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. राहिलेला मावेजा, पुनर्वसित ठिकाणी आवश्यक नागरी सुख-सुविधा तसेच पुनर्वसित जागेसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मावेजा शेतकऱ्यांना लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले. सुकळी गावाच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने ॲडव्हान्स मावेजा वाटपाचा हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, उर्वरित पात्र लाभार्थ्यांनाही नियमानुसार मावेजा मिळण्याची अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

चौकट : आमदारांच्या पाठपुराव्याबद्दल ग्रामस्थांकडून आभार

सुकळी गावच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्याबद्दल सरपंच संतोष सौंदनकर यांच्यासह ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले. पुनर्वसनातील उर्वरित प्रश्नही लवकर मार्गी लागावेत, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

